“एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित खावटी कर्जवाटप योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन”- संदर्भ नांदेड जिल्हा

वाणिज्य विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच.डी. (Ph.D.) पदवीच्या नोंदणीसाठी सादर करावयाचा नियोजित संशोधन आराखडा.

● संशोधक ●

अश्विनी माधवराव पेरेवार

(एम.कॉम. बि.एड)

Email_ perewarashwini1991@gmail.com

Mobile No : 9146222888

Category : OBC

● मार्गदर्शक ●

डॉ. शुभांगी एल. दिवे

(वाणिज्य विभाग प्रमुख)

संशोधक मार्गदर्शक

बळीराम पाटील महाविद्यालय,

किनवट जि. नांदेड

Email_ shubhangeediwe@gmail.com

Mobile No : 7588430343

मार्च-2022

“एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित खावटी कर्जवाटप योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन”- संदर्भ नांदेड जिल्हा

1. प्रस्तावना :-

भारतीय संस्कृती जेव्हा आपण अभ्यासतो तेव्हा विविध रुपी संस्कृती व समाजाचे दर्शन या संस्कृती मध्ये घडते. जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृतीला मोलाचे स्थान आहे. मुळात भारतीय संस्कृती म्हणजे सर्व समाजाच्या संस्कृतीचे एकत्रीकरण असेही आपण म्हणु शकतो. अशा या संस्कृतीचा आदिवासी समाज हा एक अविभाज्य भाग आहे. आज 21 व्या शतकाच्या उंबरठयावर आदिवासी समाजाचाही सर्वांगिण विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करणे अत्यंत महत्वाचे आहे. असे हे आदिवासी आहेत तरी कोण? आणि कसे ?

आदिवासी संस्कृती म्हणजे प्रागैतिहासीक काळापासून चालत आलेली आदिमानवाची आदिमसंस्कृती आहे. त्यांची संस्कृती म्हणजे जिवनशैली ही आजही पुर्णपणे निसर्गावर अवलंबुन आहे. निसर्ग म्हणजेच प्रकृती. हीच आजही त्यांच्या जगण्यामागची प्रेरणा आहे. त्यांचे जगणे म्हणजे त्यांनी साजरा केलेला प्रकृतीचा उत्सव आहे. अशीही निसर्गप्रेमी संस्कृती असलेली अदिवासी जमात हि आपल्या नांदेड जिल्हयातही आढळते. नांदेड जिल्हयामध्ये गोंड, राज गोंड, आंध, भिल्ल, कोलाम आणि परधान या आदिवासी जमाती आहेत. आदिवासी गोडांची खेडी व इतर समाजाचे छोटे-छोटे गाव खेडी व तांडे अशा स्वरुपातील लोक जिवनाचे दर्शन इथे आढळते. भौगोलिक दृष्टया पाहता नांदेड येथे जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपने कोरडेच असते. ऋतुनुसार जिल्हयातील तापमानामध्ये खुप बदल होत जातो. त्याामुळे येथे पावसाचे दुर्भिक्ष्य जाणवते. तसेच अतिदुर्गम व डोंगराळ भाग असल्यामुळे येथे शेतीचे हवे तसे उत्पन्न ही मिळत नाही. या भागात वेळोअवेळी होणारा पाऊस वादळ वारे व गारपिटीमुळे पिकांचे नुकसान होत असल्यामुळे येथील आदिवासी शेतकरी नेहमीच असंतोषी असतात.

नांदेड जिल्हयातील एकुण लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 3361292 असुन त्यात एकुण अदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 8.38% इतके आहे.त्यच बरोबर नांदेड जिल्हयात

एकुण 16 तालुक्यांचा समावेश होतो त्यामध्ये भोकर, किनवट व हदगाव या तालुक्यान मध्ये आदिवासी जमातीचे प्रमाण मोठया प्रमाणात आढळते अशा या अदिवासी समाजाच्या विकासासाठी शासन स्तरावर नवनविन योजना आखल्या जात आहेत. परंतु या सोयी आणि त्या योजनांचा लाभ घेण्यास प्रवृत्त करणे हे शक्य झाले तरच आदिवासी आणि पर्यायाने नंतर समाजाची प्रगती होणे शक्य होईल. खावटी कर्ज वाटप या कल्याणकारी योजनांच्या विश्लेषणाची, यशस्वीतेची आणि त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणुनच या प्रेरणेने मी **"एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित खावटी कर्जवाटप योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन"- संदर्भ नांदेड जिल्हा** या विषयाची संशोधन शोधप्रबंधासाठी निवड केली आहे.

गट पातळी वरील निरनिराळ्या योजनांतर्गत योजना व सेवा यांचं एकात्मीकरण करणे हे एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्पाची कल्पना होती. तथापि, महाराष्ट्रामध्ये एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यास अन्य विभागाच्या गटस्तरीय यंत्रनेचे पर्यवेक्षण करण्याचे व प्रशासनीक नियंत्रण करण्याचे अधिकार नव्हते. म्हणुन प्रकल्प पातळीवर जबाबदार ठरु शकेल, अशा प्रकारचे सेवा आणि पर्यवेक्षण याचं यथायोग्य एकात्मिकरण होण्याच्या दृष्टीने एक उणीव भासत होती. ही उणीव दूर करण्यासाठी शासनाने, नोव्हेबर, 1993 मध्ये अमरावती जिल्हयातील चिखलदरा येथील एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्पासह एकुण 11 ए.आ.वि.प्र. अत्यंत संवेदनशील म्हणुन घोषित केले. संवेदनशील म्हणुन घोषित केलेल्या 11 प्रकल्पांचे प्रशासन बळकट करण्याचे ठरविण्यात आले. त्यापैकी आपल्या नांदेड जिल्हयातील किनवट ए.आ.वि.प्र. चा देखील अत्यंत संवेदनशील प्रकल्पामध्ये समावेश होतो.

महाराष्ट्र शासनाने 10 मे 1977 पासून किनवट येथे प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कार्यालय सुरु केले. आदिवासी समाजाचा आर्थीक आणि सर्वांगिण विकास हे या महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट असल्या मुळे त्यादृष्टीने येथे विविध योजना राबविल्या जातात. अशा योजना राबवित असतांना विविध योजनां मध्ये समन्वय साधण्यासाठी आणि कार्यक्षमपणे त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी काही उपयुक्त

योजनांचा नवसंजीवन योजनेमध्ये समावेश केला आहे. प्रस्तुत अभ्यास विषय असलेली खावटी कर्ज वाटप योजनाही नवसंजीवन योजने मधील एक प्रमुख योजना आहे.

2. संशोधन विषयाचे महत्व आणि गरज :-

पावसाळयाच्या दिवसांमध्ये शेतीला लावण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नसल्यामुळे आदिवासी लोक अल्पशा कर्जासाठी आपले संपूर्ण उभी पिके खाजगी सावकाराला तारण म्हणुन देत असतात. आणि जिवनावश्यक वस्तु खरेदी करत असत. यामध्ये खाजगी व्यापारी आणि सावकार यांच्याकडून आदिवासींची मोठया प्रमाणात आर्थीक पिळवणुक होत असे. त्यामुळे आदिवासी समाज हा कायमचा कर्जबाजारी राहत असे. हे सर्व टाळण्यासाठी शासनातर्फे खावटी कर्ज वाटप योजना राबविली जाते. या योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना कुटूंबातील व्यक्तींच्या संख्येनुसार कर्ज दिले जाते. ते कर्ज धान्याच्या आणि पैशाच्या स्वरुपात असते. राज्यशासन आणि शेतकरी आर्थीक दृष्टया दुर्बल व अनुसूचित जमातीच्या कुटूंबीयांना आर्थीक सहाय्य देण्याची संवेदनशील भुमिका नेहमीच घेतलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी पावसाळयात माहे जुन ते सप्टेंबर या कालावधीत रोजगार उपलब्ध होत नाही म्हणून आर्थीक विवंचनेतून अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांची उपासमार होऊ नये म्हणून सन 1978 पासून खावटी कर्ज योजना राज्यशासनाकडून सुरु करण्यात आली. सदर योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादीत, नाशिक यांचे मार्फत राबविली जात असे. त्यासाठी राज्यशासनाकडून आदिवासी विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन दिला जात असे. सन 1978 ते 2013 पर्यंत राबविण्यात आलेल्या खावटी कर्ज योजने अंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटूंबातील संख्येनुसार 4 युनिट पर्यंत रु. 2000/- 5 ते 8 युनिट पर्यंत रु. 3000/- 8 युनिट च्या पुढे रक्कम रु. 4000/- यानुसार वाटप करण्यात येत होते. खावटी कर्ज योजने अंतर्गत कर्जाचे वाटप 50% वस्तुरुपात व 50% रोख स्वरुपात करण्यात येत होते. ज्यामध्ये 70% कर्ज व 30% अनुदान असे योजनेचे स्वरुप होते.

दि.22 मार्च 2020 पासून कोरोना महामारी चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन लागु करण्यात आलेला आहे. परंतू लॉकडाऊन मुळे कामे बंद असल्यामुळे

अनुसूचीत जमातीच्या कुटूंबियांवर बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. रेल्वे, सार्वजनिक बस वाहतुक व खाजगी वाहतुक बंद असल्याने अनुसूचीत जमातीच्या कुटूंबास अन्नधान्याची उपलब्धता व त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सद्य: स्थितीत अनलॉक ची प्रक्रिया सुरु आहे. परंतू त्याअंतर्गत दळणवळणाच्या साधनांची मर्यादा व किमाण रोजगाराची उपलब्धता या गोष्टींचा विचार करता. अशा आपातकालीन परिस्थीतीमध्ये अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांना न्याय देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने त्वरीत पावले उचलुन अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांना मदत करावी या अनुषंगाने खावटी कर्ज वाटप योजना अमलात आणली गेली.

योजनेच्या पुढील उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी या योजनेची गरज आहे.

1. पावसाळयाच्या दिवासांमध्ये होणारी उपासमार टाळणे.
2. सावकारांकडून होणारी आर्थिक पिळवटून टाळणे.
3. अल्पभुधारक आणि भुमिहीनांना आर्थिक सहाय्य करणे.
4. आदिवासींची कुपोषणांची समस्या टाळणे.

3. **संशोधन पध्दती** :-

"एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित खावटी कर्जवाटप योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन"- संदर्भ नांदेड जिल्हा या विषयाचे संशोधन करीत असतांना प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोताद्वारे माहितीचे संकलन करण्यात येईल. आदिवासी जमातीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्यामुळे प्रत्यक्ष आदिवासी लाभार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात येतील तसेच योजनेची मुल्यमापन करण्यासाठी गृहितके निश्चित करण्यात येतील. तसेच संशोधनासाठी वर्णनात्मक आणि निदानात्मक आराखडयाचा उपयोग केला जाईल. योजनेची माहिती, आकडेवारी पुढील पध्दतीने संकलीत केली जाईल.

1) **प्राथमिक सामग्रीचे संकलन** :-

प्राथमिक सामग्रीचे संकलन पुढील पध्दतीने केल जाईल :

अ) प्रश्नावली :- या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी तसेच शासकीय कर्मचाऱ्यांसाठी परिपूर्ण प्रश्नावली तयार केली जाईल. त्या प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी माहिती प्राप्त केली जाईल.

ब) पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती :-ही योजना राबवित असतांना येणाऱ्या अडचणी समजुन घेण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात येतील. यामध्ये प्रामुख्याने किनवट तालुक्यातील कार्यरत आदिवासी लोकप्रतिनिधींचा समावेश असेल.

क) निरीक्षण :- प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे योजनेच्या कार्यपध्दतीचे आणि समस्यांचे प्रत्यक्ष अवलोकन केले जाईल.

ड) लाभार्थ्यांच्या मुलाखती :- योजनेची माहिती घेण्यासाठी काही निरक्षर लाभार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात येतील.

2) **द्वितीय सामग्रीचे संकलन** :-

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय सामग्री पुढील पध्दतीने संकलित केली जाईल.

अ) विविध लेखकांच्या उपयुक्त ग्रंथाचा आणि संशोधनाचा आधार घेतला जाईल.

ब) शासकीय कार्यालयातील वार्षिक अहवाल, आणि कार्यालयातून उपलब्ध झालेली माहिती आणि आकडेवारी संकलीत केली जाईल. तसेच योजने बाबतचे शासनाद्वारे वेळोवेळी प्रकाशित झालेली परिपत्रके, शासन निर्णय संकलित केली जातील.

क) मागील वर्षी योजनेवर झालेला खर्च आणि कार्यवाही याबाबत कार्यालयीन अभिलेखांचा आधार घेण्यात येईल.

अशाप्रकारे संशोधनासाठी आवश्यक ठरणाऱ्या सामग्रीचे संकलन केले जाईल.

4. संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे निश्चीत करण्यात आलेली आहेत.

1. नांदेड जिल्हयातील आदिवासी लोकांच्या राहणीमानांचा तसेच आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
2. खावटी कर्ज वाटप योजनेच्या स्वरुपाचा सुक्ष्म अभ्यास करणे.
3. खावटी कर्ज वाटप योजनेच्या कार्यपध्दतीचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे तसेच योजनेची उपयुक्तता तपासणे.
4. खावटी कर्ज वाटप योजना राबवित असतांना महामंडळाला येणाऱ्या अडचणींचे अध्ययन करणे.
5. खावटी कर्ज वाटप योजनेचे मुल्यमापन करुन त्यातील दोष शोधणे.
6. खावटी कर्ज वाटप योजना अधिक उपयुक्त होण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

5. संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख गृहितके पुढील प्रमाणे निश्चीत केलेली आहेत.

1. खावटी कर्ज वाटप योजनेमुळे आदिवासींच्या आर्थिक शोषणाला आळा बसला आहे.
2. खावटी कर्ज वाटप योजनेमुळे पावसाळयांच्या दिवसामध्ये होणाऱ्या आदिवासींच्या उपासमारीचे प्रमाण कमी झाले आहे.
3. या योजनेमुळे आदिवासी अल्पभुधारकांना शेतीसाठी आर्थिक मदत प्राप्त होत आहे.
4. खावटी कर्ज वाटप योजनेमुळे आदिवासींच्या कुपोषणाच्या समस्येला आळा बसला आहे.

6. **नमुना पध्दती** :-

"एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित खावटी कर्जवाटप योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन"- संदर्भ नांदेड जिल्हा या योजनेचे अध्ययन करीत असतांना ही योजना राबविल्या जाणाऱ्या जिल्हयातील सर्व तालुक्यातील गावांचा व लाभार्थींचा अभ्यास केला जाई. **लाभार्थ्यांची निवड ही लॉटरी पध्दतीने केली जाईल**. तसेच प्रत्यक्ष पाहणी, प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षणाद्वारे माहिती जमा केली जाईल. या योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीही वापरली जाईल. 70% लाभार्थ्यांची प्रश्नावली व अधिकाऱ्यांच्या मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली जाईल.

नांदेड जिल्हयामध्ये एकुण 16 तालुक्यांचा समावेश होतो. त्यामध्ये नांदेड, अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलुर, धर्माबाद, हदगांव, हिमायतनगर, कंधार, किनवट, लोहा, माहुर, मुदखेड, नायगांव, उमरी यांचा समावेश होतो. त्यापैकी सर्वाधिक आदिवासींची लोकसंख्या हि किनवट, हदगाव, भोकर या तालुक्यांमध्ये आढळुन येते. त्यापैकी किनवट तालुक्यामध्ये 181 गावाचा समावेश होतो. हदगाव मध्ये 154 गावांचा समावेश होतो. आणि भोकर मध्ये 84 गावांचा समावेश होतो. वरिल तिन्हीही तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण खालीलप्रमाणे दर्शविलेले आहे. त्यापैकी किनवट, हदगांव व भोकर यामध्ये समाविष्ट होणाऱ्या गावांची निवड याद्दच्छिक नमुना पध्दतीने केली जाईल.

तालुक्याचे नाव	एकुण लोकसंख्या	अदिवासी लोकसंख्या	प्रमाण
किनवट	219332	71896	32.77 %
हदगाव	232553	30347	13.06 %
भोकर	138313	26186	18.93 %

नमुना पध्दती

1) **लॉटरी पध्दती** (लाभार्थ्यांची निवड)
2) **याद्दच्छिक नमुना पध्दती** (गावांची निवड)

7. **वार्षिक नियोजन** :-

अ.क्र.	शैक्षणिक वर्ष	कार्य नियोजन
1	2021-22	परिपत्रके व माहिती जमा करणे. एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातून योजनेची इतिहास व पार्श्वभूमी जमा करणे. लाभार्थ्यांची प्रश्नावली तयार करणे तसेच अधिकाऱ्यांची भेट व मुलाखती घेणे.
2	2022-23	एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे.
3	2023-24	निष्कर्ष काढणे, उपाय योजना सुचविणे, कच्चा मसुदा तयार करणे, मार्गदर्शकांच्या अंतिम सुचना व बदल छपाई व सादरीकरण.

8. **संशोधनाची मर्यादा** :-

सदरील योजनेच्या अभ्यासासाठी नांदेड जिल्हा निवडला असून नांदेड जिल्हयात एकुण 16 तालुके येतात. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी जाऊन माहिती संकलित करण्यासाठी क्षेत्र व्यापक ठरत आहे. त्यामुळे सदरील संशोधनाला न्याय देण्यासाठी व संशोधन पुर्णत्वाकडे नेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

9. **प्रकरण योजना** :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रकरणांची योजना पुढील प्रमाणे केली जाईल.

1. प्रस्तावना (Introduction).

2. संशोधन पध्दती (Research Methadology).

3. खावटी कर्ज वाटप योजना (Consumption Finance Scheme)

4. खावटी कर्ज वाटप योजनेचे मुल्यमापन(Evaluation Consumption Finance Scheme).

5. निष्कर्ष आणि उपाययोजना (Conclusion And Recommendation).

•संदर्भ ग्रंथ•

1. आदिवासींचे शिक्षण- डॉ. गोविंद गारे.
2. संशोधन पध्दती - डॉ. सुधिर बोधनकर, साईनाथ प्रकाशन, नागपुर.
3. संशोधन पध्दती - डॉ. गंगाधर व्ही. कायंदे पाटील.
4. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट महामंडळाचे वार्षिक अहवाल.
5. शासनाने प्रसिध्द केलेली योजने संबंधीची शासन निर्णय.
6. शासनाची वेळोवेळी प्रसिध्द केलेली परिपत्रके.
7. प्रस्तुत विषया संबंधी वृत्तपत्रे, मासिके यात वेळोवेळी प्रसिध्द झालेली माहिती.
8. Tribal Research Bulletin.
9. Annual Tribal Sub Plan Report.
10. The Problems of Tribal Development - Dr. M.G. Kulkarni.

मार्गदर्शक
डॉ. शुभांगी एल दिवे
विभाग प्रमुख
बळीराम पाटील कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय,
किनवट जि. नांदेड

संशोधक
अश्विनी माधवराव पेरेवार
(एम.कॉम. बि.एड)